३७४(१)/२०१९/१४-ब **दिनांक- २७ सप्टेंबर, २०१९**

**महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा-२०१९**

**(विद्युत अभियांत्रिकी)**

**घोषणा**

**जाहिरात क्रमांक (०५/२०१९)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २३ जून, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा-२०१९ चा निकाल **दिनांक २७ सप्टेंबर, २०१९** रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत पदाकरिता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**३. महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१९ परीक्षा रविवार दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात येईल.**

**४.** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ मध्ये विहित करण्यात आलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस. व्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा-शुल्क विहित मुदतीत, विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्वीकारार्ह ठरतील.

**ठिकाण:- मुंबई**

**उपसचिव (परीक्षा-१)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**